**<u>नियमित दिवाणी कज्ञा क्र.४३/२०१४ मधील नि.क्र. ६१ वरील आदेश</u>**
( पारीत दिनांक – ११/१२/२०२३)

लक्ष्मीबाई दत्तु पाटील वगैरे२ वि. गणपती काळु पाटील वगेरे ३

**CNR MHKO130001712014**

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द दि. ०८/११/२०२३ रोजी झालेला 'पुरावा बंद' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २८ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु प्रतिवादी हे त्यानंतर तारखेस मे.कोर्टामध्ये हजर न राहिलेचे कारणास्तव त्यांचे विरुध्द 'पुरावा बंद' असा आदेश झाला आहे. प्रतिवादी यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेनंतर प्रतिवादी यांच्या आईचे ऑपरेशन झालेचे कारणास्तव त्यांना विहीत कालावधीमध्ये मे.कोर्टामध्ये हजर राहणे अडचणीचे झालेले होते. प्रतिवादी यांना त्यांचे वकीलांशी संपर्क साधून त्याबाबतची माहिती वकीलांना देता आली नाही. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्द होवून मिळणे न्यायाचे कारणास्तव आवश्यक आहे. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्द न झालेस प्रतिवादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट, पुरावा बंद चा आदेश रद्द झालेस दाव्याच्या अंतिम निकाल होणेस मदत होईल. सबब, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

**३.** सदर अर्जाच्या मागील बाजूस वादीने आपले म्हणणे दाखल केले आहे. सदरचा अर्ज चुकीचा, खोटा, लबाडीचा असून वादींना तो मान्य व कबूल नाही असे प्रतिवादींचे कथन आहे. तसेच या कामी वादी यांनी जानेवारी, २०२३ मध्ये 'पुरावा बंद' केलेनंतर मार्च, २०२३ मध्ये प्रतिवादी यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादींना याकामी अर्जन्सी आहे तरीही ब–याच संधी देवूनही प्रतिवादी हजर न राहिलेने त्यांचेविरुध्द 'उलटतपास नाही' हा आदेश करुन पुरावा बंद करणेत आला आहे. केवळ विलंब करणेकरीता प्रतिवादी जाणीवपूर्वक मे.नयायालयात हजर राहत नाहीत, तरी प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा व अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादीकडून वादी यास रक्कम रु. ३०००/– इतकी रक्कम खर्च स्वरुपात मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

**४.** उभय बाजूंच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी यांच्या विरुध्द 'पुरावा बंद' असा आदेश दि. ०८/११/२०२३ रोजी झालेला आहे असे दिसते. प्रतिवादीने अर्जात केलेली कथने ही शपथेवरती आहेत. त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, प्रतिवादीस पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहील तसे न झाल्यास याकामी त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. किंबहुना, तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन होईल. प्रतिवादींमुळे याकामी जो विलंब झालेला आहे त्याकरीता काही रक्कम प्रतिवादींवर खर्च म्हणून बसविणे योग्य राहील. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.६१) प्रतिवादी यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये २००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी विरुध्द झालेला 'पुरावा बंद' असा आदेश रद्द करण्यात येतो.

स्वाक्षरी/–.

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – ११/१२/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.